महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

मुख्य संपादक : रविंद्र घोडविंदे ■ कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ २७ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०६६ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

थोडक्यात महत्वाचे

## ओमी कलानी- श्रीकांत शिंदेंच्या एकत्र प्रवासाने राजकीय चर्चांना उधाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :**

उल्हासनगरच्या राजकीय वर्तुळात रविवारी संध्याकाळी एक दृश्य चांगलेच गाजले. शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे ओमी कलानी यांच्या वाहनातून प्रवास करताना दिसले. एकेकाळी 'दोस्ती का गठबंधन' या नावाने लोकसभा निवडणुकीत एकत्र आलेले हे समीकरण आता पुन्हा दृढ होत असल्याचे संकेत मिळत आहेत. ओमी कलानींच्या सारथ्यात श्रीकांत शिंदेंचा हा प्रवास केवळ साधा दौरा नव्हता, तर तो आगामी पालिका निवडणुकीतील संभाव्य आघाड्यांचे चित्र उभे करणारा ठरणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. शहरात भाजप आणि कलानी गटातील वादंग वाढत असताना शिंदे-कलानी जवळीकतेमुळे नव्या राजकीय चर्चांना उधाण आले आहे. आठ वर्षांपूर्वी भाजपने कलानींच्या करिष्म्याचा वापर करून पालिकेवर सत्ता मिळवली होती, मात्र मतभेदांनंतर कलानींनी पुन्हा शिवसेनेशी जवळीक साधत महापौरपद शिवसेनेला मिळवून दिले. त्यानंतरची शिवसेना-कलानी जवळीक लोकसभा निवडणुकीत आणखी ठळक झाली, जेव्हा ओमी कलानी यांनी महायुतीऐवजी फक्त खासदार डॉ. श्रीकांत शिंदेंना पाठिंबा देत प्रचारात सक्रिय सहभाग घेतला.





## कल्याण बाजार समितीच्या फुल मार्केटमध्ये खरेदीसाठी तोबा गर्दी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण शहरातील बाजारपेठा कोंडीने जाम झाल्या आहेत. त्याच बरोबर कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फळे, फुले खरेदीसाठी फूल विक्रेते, नागरिक यांची झुंबड उडाल्याने पहाटेपासून पत्रीपूल ते शिळफाटा, तिसगाव ते नेवाळ रस्ता कोंडीने गजबजून गेला आहे गणेशोत्सवानिमित्त खरेदीसाठी निघालेल्या भक्तांना या वाहतूक कोंडीमुळे मनःस्ताप सहन करावा लागतोय.. विशेषतः फूलबाजारात भाविकांमध्ये गणरायाला आवडणारी जास्वंदीची फुले, दूर्वा, विविध फुलांच्या कंठ्या, गजरे आदींच्या खरेदीची लगबग पाहायला मिळाली. फूलबाजार गणेशोत्सवानिमित्त विविध रंगी फुलांनी आणि ग्राहकांनी अक्षरशः बहरून गेला.

कल्याणच्या कृषी उत्पन्न बाजारातील फुल मार्केटमधील ही फुलं आज आनंदाने बहरून आलीये.

लाडक्या गणरायाच्या आगमनासाठी गणेशभक्तांनी सकाळपासून विविध प्रकारची फुल खरेदी करण्याला प्राधान्य दिलं. इतर दिवसांपेक्षा बाजर भावही चांगला मिळाल्यानं बाप्पा पावला अशा भावना फुल विक्रेत्यांनी व्यक्त केल्या. सर्व फुलांमध्ये पिवळया झेंडूला जास्त मागणी असल्यानं झेंडूच्या फुलांचा तोरा बाजारात काही औरच होता.

गणेशोत्सवापूर्वीच्या खरेदीसाठी एकाचवेळी नागरिक पायी, वाहने घेऊन घराबाहेर पडले आहेत. यामुळे बाजारपेठा गजबजून गेल्या आहेत. त्याच बरोबर या बाजारपेठांमध्ये प्रवेश नसताना चारचाकी, दुचाकी वाहने घेऊन काही वाहन चालक शिरल्याने डोंबिवली, कल्याण पत्रीपूल ते शिळफाटा, तिसगाव ते नेवाळ रस्ता कोंडीने गजबजून गेला आहे.

## नवीमुंबईतील वगळलेल्या १४ गावांचा प्रभागरचनेत समावेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशी, ता. २६ :** राज्य शासनाच्या निर्देशानुसार नवी मुंबई महापालिकेने आगामी पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागरचना नुकतीच प्रसिद्ध केली आहे. नव्या प्रभागरचनेनुसार २८ प्रभागांतून १११ नगरसेवक नवी मुंबई महापालिकेत असणार आहेत.

नवी मुंबई महापालिकेतून वगळलेल्या १४ गावांना पुन्हा समाविष्ट करण्यात आले असून, या १४ गावांचा निवडणूक प्रारूप प्रभागरचनेत समावेश करण्यात आल्याने ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे. मागील अनेक वर्षांपासून येथील नागरिकांनी आपल्याला नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट करावे, या मागणीसाठी आंदोलन केले होते. त्यानंतर त्यांना आता प्रारूप प्रभागरचनेत समाविष्ट करण्यात आल्याने पालिकेच्या निवडणुकीत त्यांना मतदानाची संधी मिळणार आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार प्रभागरचना प्रारूप आराखडा तयार करण्याचे निर्देश निवडणूक आयोग आणि शासनाकडून संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. त्यानुसार नवी मुंबई महापालिकेने निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागरचना २२ ऑगस्ट रोजी जाहीर केली आहे. जाहीर केलेल्या प्रभागरचनेनुसार २८ प्रभागांत १११ नगरसेवक असणार आहेत. या प्रभागरचनेवर ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत हरकती आणि सूचना नोंदविता येणार असल्याचे पत्रकात म्हटले आहे.

दरम्यान, महापालिकेत १४ गावे समाविष्ट करण्यात आल्याने महापालिकेतील १११ या सदस्यसंख्येत वाढ होईल, असे अपेक्षित होते. मात्र पालिकेने सीमांकन वाढवून १११ सदस्यसंख्या कायम ठेवत वगळलेल्या १४ गावांना प्रारूप प्रभागरचनेत समाविष्ट केले आहे. महापालिकेत अ, ब, क, ड मिळून एक प्रभाग निश्चित करण्यात आला आहे. प्रभागरचनेत समाविष्ट केल्याने १४ गावांतील स्थानिक प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्र आणि नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

वनमंत्री गणेश नाईक यांनी १४ गावांचा नवी मुंबई समावेश करताना त्यांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला तरच या गावांना समाविष्ट करून घेऊ, अशी भूमिका घेत विरोध दर्शविला होता. मात्र महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या भाजप नेते व मंत्री नाईकांची मागणी धुडकावत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयानुसार निवडणूक प्रारूप रचनेतही १४ गावे समाविष्ट केली आहेत.

## गणेश आगमन , विसर्जनाच्या दिवशी अवजड वाहनांना बंदी

### - जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचे यंत्रणेला आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - गणेशोत्सव काळात जिल्ह्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सुरळीत वाहतूक व्यवस्थेसाठी सर्व यंत्रणांनी सतर्क राहून मिशन मोडवर काम करावे. तसेच गणेश आगमन आणि विसर्जनाच्या दिवशी जिल्ह्यांतील शहरात अवजड वाहनांना बंदी घालावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी पोलिस प्रशासन आणि वाहतूक विभागाला दिले. ठाणे जिल्ह्यातील रस्ता सुरक्षा संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. गणेशोत्सव दरम्यान ठिकठिकाणी मंडप, मिरवणुका, आरास तसेच भक्तांची प्रचंड गर्दी होत असते. शहरातील रस्त्यांवर नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढते, विसर्जनाच्या मिरवणुका चालतात. अशा वेळी वाहतुकीत अडथळे निर्माण होऊ नयेत, नागरिकांना गैरसोय होऊ नये आणि आपत्कालीन सेवांना तात्काळ मार्ग मिळावा यासाठी अवजड वाहनांवर बंदी घालणे अत्यावश्यक असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.






# गीतासार

## अध्याय १८

## मोक्षसंन्यासयोगः

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः । तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम
॥ १८-७८ ॥

जेथे योगेश्वर भगवान श्रीकृष्ण आहेत आणि जेथे गांडीव धनुष्य धारण करणारा पार्थ (अर्थात पृथापुत्र अर्जुन) आहे, तेथेच श्री, विजय, विभूती आणि अचल नीती आहे, असे माझे मत आहे. ॥ १८-७८ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीता सूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे मोक्षसंन्यास योगो नामाष्टादशोऽध्यायः ॥१८॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्‌भगवद्‌गीता रूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील मोक्षसंन्यासयोगः नावाचा हा अठरावा अध्याय समाप्त झाला. ॥ १८ ॥

समाप्त

## रेसिपी

### उकडीचे मोदक



**साहित्य**

१/२ कप पाणी,१/२ कप दूध,१ टीस्पून तूप,चिमूटभर मीठ,१ कप तांदळाचे पीठ,१ टेबलस्पून तूप,१ टीस्पून खसखस,१ १/२ कप किसलेला ताजा नारळ,१ टेबलस्पून बारीक चिरलेले काजू,१ टेबलस्पून बारीक चिरलेले बदाम,३/४ कप गुळ / गूळ,१/२ टीस्पून वेलची पावडर,१/४ टीस्पून जायफळ पावडर,केशर

**कृती**

मध्यम आचेवर एक पॅन गरम करा आणि त्यात पाणी, दूध, तूप आणि मीठ घाला.चांगले मिसळा आणि उकळी आणा. मिश्रण उकळू लागल्यावर त्यात तांदळाचे पीठ घाला आणि पटकन मिसळा.उकड झाकून ठेवा आणि मंद आचेवर फक्त ५ मिनिटे वाफ घ्या.गॅस बंद करा आणि उकड आणखी ५ मिनिटे गॅसवर राहू द्या.उकड गरम असतानाच एका डिशमध्ये काढा. भांड्याच्या तळाला तूप किंवा तेलाने चांगले ग्रीस करा आणि त्याच्या मदतीने उकड मळून घ्या. उकड छान आणि मऊ होईपर्यंत हाताने चांगले मळून घ्या. त्यातून एक छोटासा भाग घ्या आणि तो गुळगुळीत आणि एकसारखा करा.कोरडे पीठ बोटांना चोळा आणि उकडपासून परी किंवा कटोरी बनवा. परी पातळ असावी. कळ्या बनवण्यासाठी परीला चिमूटभर चिमूटभर भरा.मोदक घड्याळाच्या दिशेने फिरवा आणि कढई एकत्र करा.मोदक बंद करा आणि चांगले सील करा.जास्तीचा उकड काढा आणि मोदक एका ताटात ठेवा.मोदकाचा तळ पाण्यात बुडवा आणि स्टीमरमध्ये ठेवा. २ मोदकांमध्ये थोडी जागा सोडा.केशराचा तुकडा पाण्यात बुडवा आणि प्रत्येक मोदकावर ठेवा.मोदक मध्यम आचेवर सुमारे ८-१० मिनिटे वाफवून घ्या.
झाकण काढा आणि तपासा. जर मोदकांना छान ग्लेझ मिळाला असेल तर याचा अर्थ मोदक चांगले वाफवले आहेत.मोदक एका डिशमध्ये काढा आणि उकडीचे मोदक तयार आहेत.
स्टफिंग बनवण्यासाठी मध्यम आचेवर पॅन गरम करा आणि त्यात तूप घाला.खसखस घाला आणि ते फुगणे सुरू होईपर्यंत भाजून घ्या.ताजे नारळ घाला आणि सुमारे ३-४ मिनिटे परतून घ्या.नारळ जवळजवळ भाजून झाल्यावर, काजू, बदाम आणि गुळ घाला आणि सर्वकाही चांगले मिसळा.मिश्रण सुमारे ४-५ मिनिटे शिजवा आणि गॅस बंद करा. वेलची पावडर जायफळ पावडर घाला आणि चांगले मिसळा. स्टफिंग तयार आहे.

# गणेशोत्सव कालचा अन्‌ आजचा



गिरीधर पिंगळे
गोरठण खालापूर

आजच्या स्पर्धेच्या आणि विज्ञानवादी युगात सद्यस्थितीला पाहिले तर पूर्वीच्या काळी साजरा होणारा गणपती उत्सव आणि आजच्या स्थितीला साजरा होणारा गणपती उत्सव यात फरक पडलेला आपणास पहावयास मिळतो

एक इंग्रज गव्हर्नर निवृत्त होताना म्हणजेच भारतातून जाताना नव्या येणाऱ्या गव्हर्नरला सांगितलं की मराठी माणसांना कितीही शिक्षा केलीत तर ते सहन करतील पण त्या संस्कृतिक हस्तक्षेप केल्यास ते पेटून उठतील? यात आपल्या संस्कृती बद्दल असलेले प्रेम दिसते.

स्वातंत्र्यसंग्रामात बहुजन समाजाचा सहभाग नव्हता समाजात एकतेचा अभाव होता मग या समाजाला जागृत कसे करावे? असा लोकमान्य टिळकांना प्रश्न पडला .इंग्रज सरकार सभा व जमावबंदी होऊ नये म्हणून कडक कायदा केला म्हणून टिळकांनी शिवजयंती व सार्वजनिक गणेशोत्सव साजरे करण्याचे समाजाला आवाहन केले. त्यामुळे त्यानिमित्ताने समाज जवळ आला त्याला स्वातंत्र्यासाठी आपण काहीतरी करावयास पाहिजे अशी जाणीव निर्माण झाली. समाजातील अनेक क्रांतिकारक जन्मास आले स्वातंत्र्य मिळण्यास त्यांची मदत झाली.

स्वातंत्र्यपूर्वकाळी प्रत्येक गावाचा एकच सामुदायिक गणपती असायचा तेथे भजन कीर्तन नामस्मरण अखंड चालायचे. संपूर्ण घरात आजी आजोबा आई वडील भाऊ बहीण अशी पंधरा-वीस माणसे एकत्र असत मग त्यातील काही पत्ते खेळणे, कोणी सापशिडी, कोणी कॅरम,अशी मौज मस्ती चालायची. ग्रामीण भागात नाचगाणे यांचा संगम असे. घरोघरी मंगळागौर साजरी व्हायची गणपतीसाठी घरातच केलेले पदार्थ नैवेद्य म्हणून गणरायाला द्यायचे. उकडीचे मोदक म्हणजे गावाकडच्या प्रत्येक पदार्थाचे वर्णन काय करू? विसर्जनही अगदी साध्या पद्धतीने व्हायचे गणरायाला निरोप देताना डोळ्यात अश्रू जमा व्हायचे.नव्या जमान्यात एकत्र कुटुंब पद्धती तयार झाली आहे. हम दो हमारा एक याचा बोलबला चालू आहे. घरात गणपती पुजनासाठी बसविलाच तर लांब लांब ठिकाणी राहणारी आप्तेष्ट मंडळी कामात व्यस्त असल्याने गणपती पूजनाच्या अगदी वेळेवर हजर होणार. जेमतेम आरती कधी होते व महाप्रसाद कधी घेतो आणि परतीच्या प्रवासाला कधी निघतो असे होते. गणपती पाच दिवस ते अकरा दिवस असतो. माणसे एकत्र येतात परंतु त्याला कथा, कीर्तन, भजन यामध्ये रस नसतो तसेच पत्ते बुद्धिबळ, कॅरम, सापशिडी यात त्यांना रुची ही नाही प्रत्येक जण आपापल्या मोबाईल मध्ये गर्क झालेले असतात. एकमेकात विचारांची आदान प्रदान होत नाही. घरातील वातावरण आनंदी असेलच असे नाही. नव्याची नवलाई म्हणून डीजे आणि वेस्टन डान्स चालू असते. बाप्पाच्या समोर बदलत्या विचारांची गाणी चालू असतात. नामस्मरण बाबत अधिक बोलणे योग्य नाही.

केवळ दर्शनाने गणपती बाप्पा प्रसन्न होईल असे वाटत नाही तर लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असलेले समाज उद्बोधन होते किंवा नाही हा तर विचार करण्याची गरज आहे. चौदा विद्या व चौसष्ट कलांचा स्वामी गणपती बाप्पाला आपण मनोभावे भक्ती केल्यास आपल्या कल्याणाचा गाव दूर नाही .यासाठी वसंत बापट म्हणतात "देह मंदिर चित्त मंदिर एक तेथे प्रार्थना सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना "

# श्री गणेश चतुर्थी - शास्त्र आणि महत्त्व

गणेशोत्सव हा समस्त हिंदूंच्या श्रद्धेचा आणि आनंदाचा सण ! देशाच्या बहुतांश भागांत गणेशोत्सव हा जवळजवळ राष्ट्रीय महोत्सव म्हणूनच साजरा केला जातो. भाद्रपद शुक्ल पक्ष चतुर्थीला श्री गणेशाच्या आगमनाने मंगलमय झालेल्या वातावरणामुळे भाविकांमध्ये आनंद आणि उत्साह संचारतो. श्री गणेशचतुर्थी हा हिंदूंचा मोठा सण आहे. श्री गणेशोत्सवाच्या काळात केलेल्या श्री गणेशाच्या उपासनेने गणेशतत्त्वाचा उपासकाला अधिक लाभ होतो. सुखकर्ता, विघ्नहर्ता आणि अष्टदिशांचा अधिपती असलेल्या श्री गणेशाची पूजा भावपूर्ण होऊन त्याचा कृपाशीर्वाद मिळावा, असाच सर्व गणेशभक्तांचा प्रयत्न असतो. या लेखात श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणाऱ्या व्रताविषयीचे शास्त्र, श्री गणेशाचे पूजन कार्यारंभी करण्याचे महत्त्व, डाव्या सोंडेचा गणपति अध्यात्माला पूरक असणे, श्रीगणेशमूर्तीचे विसर्जन वहात्या पाण्यात करण्याचे महत्त्व, गणेशोत्सवातील अपप्रकार रोखणे आदी माहिती सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखात समजून घेऊया.



**कुटुंबात गणेश मूर्ती कोणी बसवावी ? :** श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणारे व्रत हे सिद्धीविनायक व्रत या नावाने ओळखले जाते. वास्तविक हे व्रत सर्व कुटुंबांत होणे क्रमप्राप्त आहे. सर्व भाऊ एकत्र रहात असतील म्हणजेच त्यांचा द्रव्यकोश (खजिना) आणि पाकनिष्पत्ती (चूल) एकत्र असेल, तर सर्वांत मिळून एक मूर्ती पुजली तरी चालते; पण ज्या वेळी द्रव्यकोश आणि पाकनिष्पत्ती कोणत्याही कारणास्तव विभक्त असतील, तर त्यांनी आपापल्या घरी स्वतंत्र गणेशमूर्ती पुजावी. ज्या कुटुंबात एकच गणपति बसवण्याची दृढ परंपरा आहे, त्या कुटुंबात ज्या भावामध्ये देवाविषयी अधिक भाव आहे, त्याच्याच घरी गणपति बसवावा.

**श्री गणेश चतुर्थीला पुजावयाची मूर्ती कशी असावी ? :** पूजेत गणपति असला, तरी गणपतीची नवीन मूर्ती आणावी. चिकणमाती किंवा शाडूची माती यांपासून मूर्ती बनवावी, असा शास्त्रविधी आहे. अन्य वस्तूंपासून (उदा. प्लास्टर ऑफ पॅरिस, कागदाचा लगदा) मूर्ती बनवणे, हे धर्मशास्त्रविरोधी, तसेच पर्यावरणाला घातक आहे. मूर्तीची उंची अधिकाधिक एक फूट ते दीड फूट असावी. मूर्ती शास्त्रानुसार बनवलेली, पाटावर बसलेली, डाव्या सोंडेची अन्‌ नैसर्गिक रंगांनी रंगवलेली असावी. परंपरा किंवा आवड यांप्रमाणे गणेशमूर्ती आणण्यापेक्षा धर्मशास्त्रसंमत गणेशमूर्ती पुजावी.

**शास्त्रोक्त विधी आणि रूढी यांचा अवधी :** भाद्रपद शुद्ध चतुर्थीस मातीचा गणपति करतात. तो डाव्या हातावर ठेवून तेथेच त्याची सिद्धीविनायक या नावाने प्राणप्रतिष्ठा आणि पूजा करून लगेच विसर्जन करावे, असा शास्त्रविधी आहे; पण मनुष्य हा उत्सवप्रिय असल्याने एवढ्याने त्याचे समाधान होईना; म्हणून दीड, पाच, सात किंवा दहा दिवस श्री गणपति ठेवून त्याचा उत्सव करू लागला. बरेच जण (ज्येष्ठा) गौरीबरोबर गणपतीचे विसर्जन करतात. एखाद्याच्या कुलाचारात गणपति पाच दिवस असेल आणि तो त्याला दीड किंवा सात दिवसांचा करावयाचा असला, तर तो तसे करू शकतो. यासाठी अधिकारी व्यक्तीस विचारण्याची जरूरी नाही. रूढीप्रमाणे पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, सहाव्या, सातव्या किंवा दहाव्या दिवशी श्री गणेशविसर्जन करावे.

श्री गणेशोत्सवाच्या दिवसांत गणेशतत्त्व नेहमीच्या तुलनेत पृथ्वीवर 1000 पटींनी कार्यरत असते. या कालावधीत गणेशतत्त्वाचा अधिकाधिक लाभ घेण्यासाठी या || ॐ गं गणपतये नमः || हा नामजप जास्तीत जास्त करु शकतो.

**श्री गणेश चतुर्थी या दिवशी चंद्रदर्शन करणे वर्ज्य असणे :** श्री गणेश चतुर्थीला 'कलंकित चतुर्थी' असेही म्हणतात. या चतुर्थीला चंद्र पहाणे वर्जित आहे. चुकूनही चतुर्थीचा चंद्र दिसल्यास 'श्रीमद्भागवता'च्या 10 व्या स्कंधाच्या 56-57 व्या अध्यायात दिलेली 'स्यमंतक मण्याची चोरी' ही कथा आदराने वाचली किंवा ऐकली पाहिजे. भाद्रपद शुक्ल तृतीयेचा किंवा पंचमीचा चंद्र पहावा. यामुळे चतुर्थीला चंद्रदर्शन झाल्यास त्याचा अधिक धोका रहात नाही. चुकून चंद्रदर्शन झाल्यास पुढील मंत्राने अभिमंत्रित केलेले पवित्र जल प्राशन करावे. या मंत्राचा 21, 54 किंवा 108 वेळा जप करावा.

सिंहः प्रसेनमवधीत् सिंहो जाम्बवता हतः ।
सुकुमारक मा रोदीस्तव ह्येष स्यमन्तकः ।। –
ब्रह्मवैवर्त पुराण, अध्याय 78

अर्थ : हे सुंदर सुकुमार ! या मण्यासाठी सिंहाने प्रसेनला मारले आहे आणि जांबुवंताने त्या सिंहाचा संहार केला आहे; म्हणून तू रडू नकोस. आता या स्यमंतक मण्यावर तुझाच अधिकार आहे.

**कार्यारंभी श्री गणेशाचे पूजन करण्याचे महत्त्व ! :** गणपति हा दहा दिशांचा स्वामी आहे. त्याच्या अनुमतीविना इतर देवता पूजास्थानी येऊ शकत नाहीत. गणपतीने एकदा दिशा मोकळ्या केल्या की, ज्या देवतेची आपण पूजा करत असतो, ती तेथे येऊ शकते; म्हणून कोणतेही मंगल कार्य किंवा कोणत्याही देवतेची पूजा करतांना प्रथम गणपतीचे पूजन करतात. गणपति अनिष्ट शक्तींना पाशाने बांधून ठेवत असल्याने त्याच्या पूजनामुळे शुभकार्यात येणारी विघ्ने दूर होतात. गणपतीने मानवाच्या नादभाषेचे देवतांच्या प्रकाशभाषेत रूपांतर केल्यामुळे आपल्या प्रार्थना देवतांपर्यंत पोहोचतात.

**डाव्या सोंडेचा गणपति अध्यात्माला पूरक असणे ! :** पूजेत शक्यतो डाव्या सोंडेचा गणपति ठेवावा. 'उजव्या सोंडेचा गणपति हा अतिशय शक्तीशाली आणि जागृत आहे', असे म्हटले जाते. पूजेत उजव्या सोंडेचा गणपति असल्यास कर्मकांडातील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून दैनंदिन पूजाविधी पार पाडावे लागतात. आजकालच्या धकाधकीच्या जीवनात कर्मकांडातील नियमांचे काटेकोरपणे पालन करणे शक्य होत नसल्याने पूजाविधीमध्ये चुका होतात आणि त्याचा आपल्याला त्रास होण्याची शक्यता असते. यासाठी पूजेत शक्यतो उजव्या सोंडेचा गणपति ठेवू नये. याउलट डाव्या सोंडेचा गणपति तारक स्वरूपाचा आणि अध्यात्माला पूरक असतो. याची पूजा नेहमीच्या पद्धतीने केली जाते.

**मूर्तीचे विसर्जन वहात्या पाण्यात करण्याचे महत्त्व :** उत्तरपूजेनंतर मूर्तीचे वहात्या पाण्यात विसर्जन करावे. उपासनाविधींमुळे गणपतीच्या तत्त्वाने समृद्ध झालेल्या मूर्तीचे विसर्जन जलात केल्यामुळे जलस्रोत पवित्र बनतो. तसेच वहात्या पाण्याबरोबर ही पवित्रके सर्वदूर पोहोचतात व अनेकांना त्यांचा लाभ मिळतो. या पाण्याचे बाष्पीभवनही होत असल्याने एकंदर वातावरण सात्त्विक होण्यास मदत होते. एखाद्या ठिकाणी वहाते पाणी उपलब्ध नसल्यास मूर्तीचे विसर्जन विहिरीत करावे. गणेशमूर्तीच्या विसर्जनाने प्रदूषण होते, अशी ओरड करणाऱ्यांनो, सांडपाण्याद्वारे होणाऱ्या भीषण जलप्रदूषणाचा विचार करा ! श्री गणेशमूर्ती विसर्जनाला विरोध करणारे भोंदू सुधारक पशूवधगृहे आणि सांडपाणी यांमुळे होणाऱ्या जलप्रदूषणाकडे डोळेझाक करतात. गणेशमूर्ती दान करण्यास सांगणाऱ्या तथाकथित सुधारकांना घनकचरा, सांडपाणी, उद्योग, ई-कचरा यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाविषयी खडसवा !

**संदर्भ :** सनातन संस्थेचा ग्रंथ 'गणपति'
संपर्क क्र.: ९८१९२४२७३३

**श्री गणेशाचे विडंबन रोखून धर्महानी टाळा ! :** वेगवेगळ्या रूपांतील आणि वेशभूषांतील मूर्तींमुळे लोकांच्या मनातील त्या देवतेविषयीच्या श्रद्धेवर आणि भावावर परिणाम होतो, तसेच देवतेला चित्रविचित्र रूपांत दर्शवल्याने तो देवतेचा अवमानच ठरतो. प्लास्टिकच्या वस्तूंपासून, लोखंडी सांगाड्यात दगड घालून, भाज्यांपासून, शीतपेयांच्या बाटल्यांपासून बनवलेले गणपति, राजकारणी, खेळाडू, संत यांच्या रूपातील गणपतिसह विविध प्रकारे गणपति बनवण्यात येतात. अशा मूर्तींमुळे श्री गणेशाचे विडंबन होते. हे विडंबन रोखून धर्महानी टाळा.

गणेशोत्सवात होणारे गैरप्रकार रोखून श्री गणेशाची कृपा संपादन करा !
सुखकर्ता, विघ्नहर्ता अन्‌ अष्टदिशांचा अधिपती म्हणजे श्रीगणपति ! वेदांच्या माध्यमातून धर्मशास्त्र सांगणारी ही देवता जशी विद्यापती आहे, तशीच ती असुरांचा नाश करणारीही आहे. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या निमित्ताने धर्माचरण शिकणे, तसेच गणेशोत्सवातील अपप्रकारांचे उच्चाटन करून धर्मरक्षणाचा संकल्प करणे, ही श्री गणेशाची खरी उपासना ठरेल .

# गणेशोत्सवात नियमित वीजपुरवठा सुरु ठेवा

## भाजपाची मागणी

### माजी शहर अध्यक्ष वरुण पाटील यांचे कार्यकारी अभियंत्यांना पत्र

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण शहरात गणेशोत्सवाच्या कालावधीत नियमित व सुरळीत वीज पुरवठा सुरु ठेवण्याची मागणी भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आली असून याबाबत भाजपाचे माजी शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक वरुण पाटील यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या कल्याण विभाग कार्यकारी अभियंता यांना पत्र दिले आहे. कल्याण शहरात दरवर्षीप्रमाणे यंदा देखील गणेशोत्सव मोठ्या उत्साहात घरगुती आणि सार्वजनिक मंडळा मध्ये साजरा होत आहे. या काळात मोठ्या प्रमाणात मंडळांमध्ये सजावट, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच सार्वजनिक गणेशोत्सवाच्या मंडपांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होते. याकरिता अखंडित व सुरळीत वीज पुरवठा आवश्यक आहे. वीज खंडित झाल्यास मंडपातील भाविकांची गैरसोय होण्यासोबतच सार्वजनिक सुरक्षिततेवरही परिणाम होऊ शकतो. या काळात वीज पुरवठा खंडित करु नये.

गणेशोत्सवाच्या संपूर्ण कालावधीत कल्याण विभागात अखंडित, नियमित व सुरळीत वीज पुरवठा राहील याची योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच अचानक बिघाड झाल्यास तत्काळ दुरुस्ती पथक उपलब्ध करून देण्याची मागणी भाजपाच्या वतीने वरुण पाटील यांनी केली आहे.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in

# ओतूर येथे अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



ओतूर : लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०५व्या जयंतीनिमित्त ओतूर येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अण्णाभाऊ साठे तरुण मित्र मंडळ, प्रगती उषा किरण उन्नती महिला बचत गट व अखिल मातंग समाज चळवळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम ओतूर व माळशेज रोडवरील राज लॉन्स मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जुन्नर तालुक्याचे माजी आमदार अतुल बेनके यांनी भूषविले. आपल्या भाषणात त्यांनी मातंग समाजाला न्याय व प्रेरणा देणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख केला. तसेच पुण्यातील संगमवाडी येथील लहुजी वस्ताद साळवे स्मारकाला तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांना भेट देण्यासाठी घेऊन जाण्याचे आश्वासन दिले.

या जयंतीनिमित्त अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याची मिरवणूक शहरातून काढण्यात आली. या मिरवणुकीत महिलांचा सहभाग विशेषत्वाने उल्लेखनीय ठरला. अण्णाभाऊंची गीतं वाजविणारा बँड हे मिरवणुकीचे आकर्षण ठरले. "अण्णाभाऊ साठे यांचा विजय असो" अशा घोषणांनी ओतूर शहर दुमदुमून गेले.

यावेळी विविध गावांतील सरपंच, उपसरपंच व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. पुण्यातील संगमवाडी लहुजी वस्ताद स्मारक समितीचे शासकीय अध्यक्ष अशोकराव लोखंडे, सकल मातंग समाजाचे समन्वयक भास्कर नेटके तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुणे जिल्हा सरचिटणीस नीता अल्हाट यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विनायक तांबे, सरपंच छायाताई तांबे, उपसरपंच प्रशांत डुंबरे, माजी सभापती विशाल तांबे, तंटामुक्ती अध्यक्ष अनुराग फापाळे, ओतूर कॉलेजचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे, अहिल्यानगरचे मातंग आघाडी अध्यक्ष रमेश वायदंडे, विराट प्रतिष्ठान महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रदीप सरोदे, लहुजी शक्ती सेनेचे विकास जाधव, युवा अध्यक्ष लहुभाऊ खंडागळे, गजानन राजगुरू, सतीश पंचरास, राजू पंचरस, चेतन साळवे, प्रदीप सरोदे, सागर पवार, जावेद मोमीन आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अमित अस्वार, सचिन कसबे, वैभव अस्वार, संतोष अस्वार, आतिश गायकवाड, सनी ठोसर, संकेत अस्वार, गणेश अस्वार यांच्यासह महिला कार्यकर्त्यांमध्ये अलका स्वर, जनाबाई स्वर, जयश्रीराम मालनस्वार, कमल माळवे, प्रतिभा पवार, उज्वला माळवे, नंदा भालेराव, पूनम पाले आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी आस्वार सर यांनी केले तर आभार प्रदर्शन योगेश आस्वार यांनी मानले.

# आजचे राशि भविष्य

**मेष**
व्यवसायातील तोट्याचे नफ्यात रूपांतर करण्यात यशस्वी व्हाल त्यामुळे तुमचा दिवस चांगला जाईल. प्रगती पाहून तुमचे शत्रू तुमचा हेवा करतील.

**वृषभ**
प्रेम जीवनात असणाऱ्या लोकांना आपल्या जोडीदाराची त्यांच्या कुटुंबातील सदस्यांशी ओळख करून देण्यासाठी आजचा दिवस चांगला असेल.

**मिथुन**
व्यवसायातील एखादा करार जर आज तुम्ही फायनल केला तर त्याचे भविष्यात खूप फायदे होतील.धार्मिक कार्यक्रमात सहभागी झाल्याने तुमचा आदर वाढेल.

**कर्क**
कुटुंबातील सदस्य या प्रस्तावाला त्वरित मान्यता देऊ शकतात. मुलाला जर परदेशात शिक्षण घ्यायचे असेल तर त्याच्यासाठीही आजचा दिवस चांगला असेल.

**सिंह**
मित्रांच्या रूपातील शत्रुंना ओळखावे लागेल. नोकरीत मैत्रिणीच्या मदतीने तुम्हाला प्रमोशन मिळू शकते. एखाद्या शुभ कार्यात सहभागी होऊ शकता.

**कन्या**
कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून विश्वासघात होऊ शकतो त्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. संध्याकाळी एखाद्या नातेवाईकाच्या घरी जाण्याचा प्लॅन करू शकता.

**तूळ**
कुटुंबातील मुलांसोबत मजा करण्यात आजची संध्याकाळ घालवाल.दिवस सकारात्मक परिणाम देणारा असल्याने तुमची सर्व कामे पूर्ण होतील .

**वृश्चिक**
पैसे गुंतवण्यापूर्वी विचार करावा लागेल.संध्याकाळी आईच्या तब्येतीबाबत थोडे जागरुक राहावे लागेल. समस्या असल्यास त्या समस्या वाढू शकतात.

**धनु**
नवीन वाहन घेण्याचा विचार करत असाल तर थोडे थांबा.आई-वडिलांच्या आशीर्वादाने कोणतेही काम केल्यास त्यात यश नक्कीच मिळते.

**मकर**
एखाद्या मित्राच्या तब्येतीबद्दल थोडे चिंतेत असाल. त्याच्यासाठी तुम्ही पैशांची व्यवस्था करण्यात धावपळ कराल. खर्च वाढल्याने तुम्ही त्रस्त व्हाल.

**कुंभ**
तुम्ही आनंदी असाल. भावंडांसोबतचे वाद विवाद सुटल्याने देखील आज तुम्ही खुश असाल. विवाहायोग्य लोकांसाठी आज विवाह प्रस्ताव येतील .

**मीन**
एखाद्या ठिकाणी अडकलेले पैसे मिळाल्याने तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल. मुलाची प्रगती पाहून तुम्हाला आनंद होईल. आवडीची एखादी गोष्ट मिळेल.


जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज, हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# गणेशोत्सवानिमित्त ठाण्यात वाहतूक बदल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे वाहतूक पोलिसांनी २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत होणाऱ्या गणेशोत्सवासाठी वाहतूक सूचना जारी केल्या आहेत. गणपती मूर्ती विसर्जनादरम्यान सुरळीत हालचाल सुनिश्चित करण्यासाठी ठाण्यातील वाहतूक व्यवस्था आणि निर्बंधांची माहिती या सूचनांमध्ये देण्यात आली आहे. त्यानुसार ठाणे शहरातील प्रमुख गणेश मूर्ती विसर्जन स्थळी गर्दी टाळण्यासाठी आणि भाविक आणि प्रवाशांना त्रासमुक्त अनुभव देण्यासाठी विशेष वाहतूक व्यवस्थापन उपाययोजना आखल्या आहेत.

ठाणे वाहतूक पोलिसांनी गणेश उत्सवादरम्यान रायलादेवी, मोड चेकपॉईंट आणि वागळे इस्टेट, रायलादेवी मंदिर, उपवन तलाव आणि वर्तकनगरभोवती सुरळीत वाहतूक व्यवस्था राखण्यासाठी वाहतुकीचे नियोजन केले आहे. यावेळी काही मार्ग बंद करण्यात आले असून पर्यायी



मार्ग देखील जारी केले आहेत. त्यामुळे नागरिकांनी वाहतूक व्यवस्थेला सहकार्य करावे असे आवाहन वाहतूक पोलीस प्रशासनाने केले आहे.

वाहतूक बंदी आणि पर्यायी मार्ग

महाराष्ट्र बँकेपासून रोड क्रमांक १६ मार्गे जिलानीवाडीपर्यंत सर्व वाहनांसाठी प्रवेश बंद आहे. गणपती मूर्ती वाहून नेणाऱ्या वाहनांशिवाय या मार्गावरील वाहनांनी मॉडेला चेकपॉईंटवरून सरळ जावे.

तसेच संकल्प चौकातील रघुनाथ नगर, हजुरी येथून महाराष्ट्र बँक जिलानीवाडीकडे जाण्यासाठी प्रवेश प्रतिबंधित आहे. त्यासाठी रहेजा कट मार्गे पर्यायी मार्ग उपलब्ध आहे.

वर्तकनगर, शास्त्रीनगर, देवदयानगर, गांधीनगर कापूरबावडी ते उपवन तलावाकडे जाणारी वाहने बिरसा मुंडा चौकात प्रतिबंधित आहेत. त्यांनी बिरसा मुंडा चौकातून उजवीकडे वळावे आणि पवारनगर मार्गे पुढे जावे. त्याचबरोबर असेन प्रायव्हेट लिमिटेड येथे डावीकडे वळावे आणि गावंडबागमार्गे जावे.

गांधीनगर कापूरबावडी आणि पवारनगर येथून उपवन तलावमार्गे येउरकडे जाणाऱ्यांनी त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचण्यासाठी बिरसा मुंडा चौकातून डावीकडे वळावे, नंतर देवदयानगर चौकातून उजवीकडे वळावे.

तर गावंडबाग परिसरातील कोकणीपाडा क्रमांक १ येथील लोटस सोसायटी मेन गेटसमोरील सार्वजनिक शौचालयाजवळील सर्व सोसायट्यांना प्रवेश बंद आहे.



# ठाणे महापालिका व रोटरी क्लब तर्फे गरजू महिला आणि तृतीयपंथीयांना ई-रिक्षाचे वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (२६) :** गरजू महिला आणि तृतीय पंथीय व्यक्ती यांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे यासाठी ठाणे महापालिका व रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटी यांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरुपात दोन ई-रिक्षांचे वाटप महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले. या कार्यक्रमास, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त अनघा कदम, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४२चे माजी गर्व्हनर दिनेश मेहता, रोटरी लेकसिटीच्या अध्यक्षा दिपाली महिंद्रा, रोटेरियन अनिरूध्द आदी उपस्थित होते.

ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे महापालिका, रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटी, एटॉस कंपनी व समर्थ भारत व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. त्याच अंतर्गत, रोटरी क्लब ऑफ ठाणे लेकसिटीतर्फे गरजू आणि स्वयंरोजगाची इच्छा असलेल्या महिला तसेच तृतीय पंथीय यांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे यासाठी ई-रिक्षा ( वीजेवर चालणारी रिक्षा) चे वाटप करण्यात आले. आतापर्यंत एकूण १५ ई-रिक्षांचे वाटप करण्यात आले आहे. त्यापैकी चार ई-रिक्षा तृतीयपंथीयांना देण्यात आल्या आहेत. महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी या रिक्षाचालकांना शुभेच्छा दिल्या.


# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

## नगररचना विभाग

-: जाहिर सूचना:-

ज्याअर्थी कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील सेक्टर क्र. ४ कल्याण पूर्व येथील, १) चक्की नाका झोझवाला कॉम्प्लेक्स ते तेजपालनगर कल्याण शिळ रोड हा विद्यमान तसेच ९.०० मी. विकास योजना रस्ता १५.०० मी. रुंद करणेसाठी, २) कल्याण पूर्व जरीमरी मंदीर १५.०० मी. वि.यो. रस्ता ते मित्रा संगम सोसायटी पर्यंतचा विद्यमान रस्ता ९.०० मी. रुंद करणेकरीता तसेच २७ गावांमधील, ३) मौजे दावडी येथील तुकाराम चौक ते शारदानगर ते आर.टी.पी. हिंदी शाळा पर्यंत या ५८१.०० मी. लांबीच्या विद्यमान रस्त्यापैकी ४५५.०० मी. लांबीचा रस्ता १२.०० मी. रुंद करणेकरीता, ४) मौजे-निळजे येथील कल्याण शिळ रस्त्यालगतच्या लक्ष्मी हॉटेल ते चंद्रेश तपोवन इमारतीपर्यंतचा कासारिओ रस्ता या ६४०.०० मी. लांबीच्या विद्यमान रस्त्यापैकी रहिवास विभागामधील २२२.०० मी. लांबीचा विद्यमान रस्ता १८.०० मी. रुंद करणेकरीता, ५) मौजे नांदीवली तर्फे पंचानंद येथील मयुरेश दर्शन इमारत ते २४.०० मी. विकास योजना रस्त्यापर्यंतच्या १८०.०० मी. लांबीच्या विद्य मान रस्त्यापैकी १००.०० मी. लांबीचा विद्यमान रस्ता ९.०० मी. रुंद करणेकरीता, ६) कल्याण पूर्व येथील मलंगरोड ते आर.टी.ओ. रोड या रस्त्यापासून नांदीवली तलाव ते पुढे ४५.०० मी. रूंद विकास योजना रस्त्यापर्यंत आणि आर.टी.ओ. रोड ते दुर्गा चाळ ते साई गोठा ते कृष्णामाई इमारती पर्यंत हा ७२०.०० मी. लांबीचा विद्यमान रस्ता १२.०० मी. रुंद करणेकरीता, ७) मौजे-नांदीवली तर्फे पंचानंद येथील गजानंद पाटील चौक ते मौजे भोपर येथील मोहन दामू माळी चौकापर्यंतच्या १०४५.०० मी. लांबीच्या विद्यमान रस्त्यापैकी ३०.०० मी. वि.यो. रस्त्यापासून ते २४.०० मी. विकास योजना रस्त्यापर्यंतच्या ५९६.०० मी. लांबीचा विद्यमान रस्ता १५.०० मी. रुंद करणेबाबत. याप्रमाणे सदर ७ रस्त्यांच्या दोन्ही बाजूंच्या रेषा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये विहीत करण्याचा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा मानस आहे. त्याकरीता सदर ७ रस्त्यांचे प्रत्यक्ष जागेवरील सर्व्हेक्षण करण्यात आले असुन सर्व्हेक्षण नकाशाच्या प्रतीवर वरीलप्रमाणे नमुद केलेनुसार प्रस्तावीत रस्त्यांची आखणी करण्यात आली आहे. सदर आखणीनुसार सेक्टर क्र. ४ कल्याण पूर्व येथील चक्कीनाका झोझवाला कॉम्प्लेक्स ते तेजपालनगर कल्याण शिळ रोड या रस्त्याच्या आखणीमध्ये आ.क. ४९०अ 'बगीचा' या आरक्षणाचे १७०.०० चौ.मी. व ४९०ब या आरक्षणाचे १३५.०० चौ.मी., २७ गावांमधील मौजे-दावडी येथील तुकाराम चौक ते शारदानगर ते आर.टी.पी. हिंदी स्कूल या रस्त्याच्या आखणी मध्ये आ.क. पी.जी. १८ या आरक्षणाचे विद्यमान रस्त्याचे १२२.०० चौ.मी. क्षेत्रासह ३६५.०० चौ.मी. आणि मौजे-नांदीवली तर्फे पंचानंद येथील गजानन चौक ते मोहन दामू माळी चौक भोपर या रस्त्याच्या आखणी मध्ये आरक्षण क्रमांक पी.जी. १० या आरक्षणाचे २०.०० चौ.मी., आ.क. जी-१६ या आरक्षणाचे ७६.०० चौ.मी. व आ.क. जी-१८ या आरक्षणाचे ८३४.०० चौ.मी. क्षेत्र कमी होत आहे.

वरीलप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये प्रस्तावीत रस्त्यांच्या रूंदीकरणाच्या दोन्ही बाजुच्या रेषा विहीत करुन मंजुर विकास योजनेमध्ये तसे फेरबदल करणेकरीता शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. सदर प्रस्तावास तत्कालीन मा. आयुक्त महोदया यांनी दि. १७/०३/२०२५ रोजी मंजुरी दिलेली आहे.

त्याअर्थी या जाहिर सुचनेव्दारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० मधील तरतुदीनुसार सदर परीसरातील तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरीकांना या जाहिर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, उक्त ७ रस्ते वरीलप्रमाणे नमुद केलेनुसार रूंद करणेकरीता कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडील सर्वेक्षण केलेल्या नकाशाच्या प्रतीवर दर्शविल्याप्रमाणे सदर ७ रस्त्यांच्या दोन्ही बाजूंच्या रेषा विहित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० प्रमाणे कोणीही वरील प्रमाणे विहित केलेल्या सदर रस्त्याच्या रेषेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू शकणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

१) नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांका पासुन एक महिन्याच्या मुदतीत आपल्या सुचना व हरकती असल्यास मा. प्रशासक तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका द्वारा सचिव, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांचेकडे लेखी स्वरूपात दयाव्यात.

२) सदर नोटीस व नकाशाची प्रत नागरिकांच्या माहितीसाठी नगररचना विभाग मुख्यालय नोटीस बोर्डवर व "५/ड, ९/आय व १०/ई प्रभागक्षेत्र" कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे.

सही
(सं. ना. डोईफोडे)
सहाय्यक संचालक , नगररचना
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जावक क्रमांक :
कडोंमपा/ जसंवि/मुका/४३८
दिनांक - २६/०८/२०२५


# पत्रकार संभाजी मोरे यांना मातृशोक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** चोरवणे गावठाणातील उतेकरवाडी येथील रहिवासी तथा टिटवाळा टाइम्सचे संपादक आणि ज्येष्ठ पत्रकार संभाजी आत्माराम मोरे यांच्या मातोश्री हिराबाई (शशिकला) आत्माराम मोरे (वय ८५) यांचे मंगळवार दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे मोरे कुटुंबासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



हिराताई म्हणजेच शशिकला मोरे या भारतीय सेनेतील माजी सैनिक आत्माराम भिवाजी मोरे यांच्या पत्नी होत. त्या कुटुंबासाठी आधारस्तंभ आणि समाजात आदर्शवत व्यक्तिमत्त्व होत्या. अत्यंत प्रेमळ स्वभाव, धार्मिकता, आणि कुटुंबप्रेम ही त्यांची ओळख होती. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य कुटुंबाच्या ऐक्यासाठी समर्पित केले. आजही मोरे कुटुंब एकत्र राहते, हे त्यांचे मोठे योगदान मानले जाते.

त्यांना वाचनाची प्रचंड आवड होती. शिवलीलामृताचा अकरावा अध्याय तसेच चातुर्मासातील ग्रंथ त्यांना तोंडपाठ होते. नित्य वाचन हीच त्यांची जीवनशैली होती. त्यांनी नेहमी समाजात आदर्श ठेवला – "आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा."


गरजूंना मदत करणे, दानधर्म करणे, सर्वांशी प्रेमाने वागणे हा त्यांच्या स्वभावाचा अविभाज्य भाग होता. कुटुंबातील सर्व सदस्यांना एकत्र ठेवत त्यांनी चार मुलगे, एक मुलगी आणि विस्तारित कुटुंबाला प्रेमाने सांभाळले.

संभाजी मोरे यांनीही आपल्या आईवडिलांची सेवा आयुष्यभर अत्यंत प्रामाणिकपणे केली. कोरोनाच्या कठीण काळातही त्यांनी आईच्या सेवेत कोणतीही तडजोड केली नाही. हे त्यांच्या मातृभक्तीचे आणि कर्तव्यदक्षतेचे जिवंत उदाहरण ठरते.

अंत्यविधी आज (मंगळवार) रात्री ८ वाजता चोरवणे उतेकरवाडी येथील स्मशानभूमीत पार पडणार आहे. नातेवाईक, समाजबांधव आणि आप्तेष्ट यांना याबबची माहिती मिळताच्या मोठ्या संख्येने ते मोरे यांच्या मुळ गावी रवाना झाले आहेत .

# उल्हासनगर महापालिकेची गणेशोत्सवासाठी दर्जेदार कामगिरी

## शहरातील रस्ते, मिरवणूक मार्ग खड्डेमुक्त



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

येणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख रस्ते, मिरवणूक मार्ग तसेच गणपती विसर्जन मार्गावरील खड्डे तात्काळ भरून रस्ते सुरळीत करण्याच्या सूचना उल्हासनगर महापालिकेच्या प्रशासक तथा आयुक्त श्रीमती मनिषा आव्हाळे (भा.प्र.से.) यांनी संबंधित विभागांना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने प्रभागनिहाय रस्त्यांवरील खड्डे मास्टीक पद्धतीने भरून काढण्यात आले आहेत. नागरिकांची सुरक्षितता, वाहतुकिची सुलभता आणि गणेशोत्सव काळातील उत्सवमूर्तींच्या मिरवणुका व विसर्जन कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी हे काम प्राधान्याने पूर्ण करण्यात आले आहे.

खालीलप्रमाणे प्रभाग निहाय मास्टीक पध्दतीने रस्त्यांव वरील खड्डे भरण्यात आले आहेत.

> “ महानगरपालिकेचे संबंधित विभाग यांनी वेळेवर व दर्जेदार काम पूर्ण केले आहे. गणेशोत्सवाच्या काळात कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. नागरिकांनी सहकार्य करत स्वच्छता, शिस्त व शांतता राखावी
>
> ● अजय साबळे
> सहा.आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी, उल्हासनगर महापालिका

**प्रभाग क्र.1**

1) चोपडा कोर्ट चौक ते योगा चौक, गुरूद्वारा चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, उल्हासनगर-1

2) शहाड ब्रिज डावी व उजवी बाजू, शहाड रेल्वे स्टेशन चौक, उल्हासनगर-1

3) टर्निंग पॉईंट ते मधूसूदन चौक, उल्हासनगर-1

4) धोबीघाट रोड,

5) भारत चौक, मच्छी मार्केट रोड ते शिरू चौक (चालिया मिरवणूक रोड)

———————

**प्रभाग क्र.2**

1) नेहरू चौक ते साधू वासवानी चौक, उल्हासनगर-2

2) सेंट्रल हॉस्पीटल चौक ते खेमानी चौक, उल्हासनगर-2

3) छत्रपती शिवाजी चौक फॉल्वर लाईन चौक ते सेंट्रल हॉस्पीटल चौक

4) सेंट्रल हॉस्पीटल चौक ते हनुमान मंदिर, उल्हासनगर-2

5) फर्निचर मार्केट लिंक रोड, उल्हासनगर-2

———————

**प्रभाग क्र.3**

1) छत्रपती शाहू महाराज उड्डानपूल, उल्हासनगर-3

2) सरगम हॉटेल श्रीराम चौक, उल्हासनगर-3

———————

**प्रभाग क्र.4**

1) नेजाजी सुभाष चौक, कैलाश कॉलनी चौक, लालचक्की ते चौक ते चालिया मंदिर प्रवेशद्वार, दुध नाका, जय झुलेलाल चौक, स्वामी सर्वानंद हॉस्पीटल, उल्हासनगर-5

2) छत्रपती शाहू महाराज उड्डानपूल, उल्हासनगर-4

3) चालिया मंदिर प्रवेशद्वार, उल्हासनगर-5

4) लालचक्की चौक, उल्हासनगर-5

5) ROP Bridge ते भारत पेट्रोल पंप

# मनोज जरांगे यांना नवी मुंबईतच रोखणार ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत आंदोलनाची घोषणा केलेल्या मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांना नवी मुंबईत किंवा पुणे जिल्ह्यात रोखण्याची तयारी राज्य सरकारने केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस महासंचालक डॉ. रश्मी शुक्ला यांच्याशी राज्यातील कायदा व सुव्यवस्था आणि जरांगे यांच्या आंदोलनासंदर्भात मंगळवारी दुपारी चर्चा केली.

जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीअंतर्गत आरक्षणाच्या मागणीसाठी गणेशोत्सवात मुंबईत बेमुदत आंदोलन सुरु करण्याचे जाहीर केले आहे. ते आंतरवाली सराटीमधून बुधवारी निघणार असून २८ ऑगस्टला रात्री उशिरा मुंबईत धडकतील. त्यानंतर २९ ऑगस्टपासून आझाद मैदानात बेमुदत आंदोलन करण्याचे जरांगे यांनी जाहीर केले आहे.

# जीवनदीप महाविद्यालयात एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनार संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

आधुनिक युगात विद्यार्थ्यांना बचत, गुंतवणूक ,समाजात होणारे सायबर गुन्हे त्यापासून बचाव कसा करावा यासारख्या विविध विषयांवर दिनांक २३- ०८- २०२५ रोजी दुपारी २.०० ते ३.०० च्या वेळेमध्ये एक ऑनलाईन वेबिनार आयोजित करण्यात आला होता . या वेबिनार च्या व्याख्यात्या प्रा. डॉ. रैना चंपावत (SEBI SMART व CSR प्रमुख RSTIL) यांनी विद्यार्थ्यांना उपरोक्त विषय तसेच शेअर बाजारातील गुंतवणूक म्युच्युअल फंड इत्यादी विषयांवर उत्तम रीतीने मार्गदर्शन केले. या एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनार ला ५७ विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून व्याख्यानाचा लाभ घेतला.

तसेच आपल्याला असलेले गुंतवणुकी बाबत प्रश्न त्यांनी विचारून त्यांच्या शंकांचे निरसन करून घेतले.

महाविद्यालयाच्या BMS विभागाच्या अंतर्गत सदर वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. उल्हास गायकर, प्रा. सचिन कांबळे, प्रा. निकिता घोडविंदे, प्रा. शैलजा मिश्रा यांचे या वेबिनार करता सहकार्य लाभले.

जीवनदीप महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, संचालक. प्रशांत घोडविंदे यांच्या मार्गदर्शनाने व सहकार्याने सदर वेबिनार यशस्वीरित्या संपन्न झाला.

# भिवंडी वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर महापालिका आणि पोलिस प्रशासनाची बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहरामध्ये होणारी वाहतूक कोंडी व त्यामुळे उद्भवणा-या समस्यांबाबत दि.२५/८/ २०२५ रोजी पोलीस विभाग आणि महानगरपालिका प्रशासनाची एकत्रिक बैठक पार पडली. या बैठकीमध्ये शहरात होणा-या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यावर चर्चा झाली. पोलीस उपायुक्त (वाहतूक) यांनी संगितले की, शहरात ८०० सि.सी.टी.व्ही कॅमेरे कार्यरत असून,



त्यांच्यामार्फत उलट दिशेने प्रवास करणारे वाहनचालक तसेच रस्त्याच्या कडेला गाड्या पार्कंग करण्या-या वाहन मालकांवर कारवाई करण्यात येईल. मात्र त्यानंतरही सुधारणा न झाल्यास नियम मोडणा-या वाहन चालकांवर गुन्हे दाखल करण्याच्या सुचना पोलीस उपायुक्त (वाहतूक) यांनी वाहतूक पोलिस याना दिल्या. तसेच शहरातील वाहतूक नियमाकरिता ट्राफ़िक वार्डन मनपाने पूरविण्याबाबत देखील मागणी केली.

भिवंडी मनपाचे मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी सर्व बांधकाम अभियंत्यांनी तातडीने युध्दपातळीवर रस्ते दुरुस्तीची कारवाई करावी असे आदेश दिले.

या बैठकीकरिता मा. पोलिस उपायुक्त शशिकांत बोऱ्हाडे, अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, पोलीस उपायुक्त (वाहतुक) पंकज शिरसाठ, उप-आयुक्त (मुख्यालय) विक्रम दराडे, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे, सहाय्यक पोलीस आयुक्त मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतुक) शरद ओहोळ, पोलीस निरीक्षक किशोर खरात, शहर अभियंता जमील पटेल, सर्व प्रभाग अधिकारी व बांधकाम विभागाचे अभियंते उपस्थित होते. अशी माहिती महापालिकेचे माहिती व जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांनी दिली.

# महापालिकेच्या कृत्रिम तलावात गणेश मूर्तींचे विसर्जन करावे !

## - कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आवहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

या वर्षीच्या श्री गणेशोत्सवासाठी श्री गणेश भक्तांच्या सोयीसुविधांसाठी महानगरपालिकेने मंडळांना लागणाऱ्या विविध परवानगी जलद गतीने व एका ठिकाणी प्राप्त व्हावी, याकरीता ऑनलाईन एक खिडकी प्रणालीचा वापर या वर्षीपासून सुरु केला आहे.

महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत एकुण 76 विसर्जन स्थळी जनरेटरची व्यवस्था करण्यात आली असून, 2475 हॅलोजन, 558 एलईडी, 105 लाईटनिंग टॉवर तसेच 38 प्रमुख लोकेशन्सवर 212 सीसीटीव्हीची कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

कल्याण मधील नागरीकांना श्री गणेश मूर्ती विसर्जनासाठी एकुण 65 ठिकाणी महापालिकेमार्फत व्यवस्था करण्यात आली असून, यामध्ये अ, ब, क, ड व जे प्रभागात "विसर्जन आपल्या दारी" ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

तर डोंबिवली मधील नागरीकांना श्री गणेश मूर्ती विसर्जनासाठी एकुण 62 ठिकाणी महापालिकेमार्फत व्यवस्था करण्यात आली असून, यामध्ये फ, ग, ह, आय व ई प्रभागात "विसर्जन आपल्या दारी" ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

शासनाच्या निर्देशानुसार 6 फुटा पेक्षा कमी उंचीच्या सर्व मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावात करणे आवश्यक आहे. यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे.

तरी यावर्षी महापालिकेने तयार केलेल्या कृत्रिम तलावात आपण आपल्या श्री गणेश मूर्तीचे विसर्जन करावे, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# राष्ट्रीय महामार्गावर ट्रक उलटल्यामुळे वाहतूक कोंडी

## वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस कर्मचारी तैनात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राष्ट्रीय महामार्गावरील ससूनवघर भागातील शनया ढाब्याजवळ मंगळवारी सकाळी मालवाहतूक ट्रक व मिक्सर यांची धडक लागून अपघात घडला. या अपघातामुळे मालवाहतूक वाहन उलटले. त्यामुळे मुंबईच्या आणि ठाण्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. मागील दहा ते बारा तास उलटूनही ट्रक बाजूला न केल्याने प्रवाशांना तासनतास या वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत आहे. पावसाळा सुरू होताच या महामार्गावर विविध समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत.




# टावरीपाडा रोड कचरामुक्त करा : स्फूर्ती फाउंडेशनची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका ब प्रभाग क्षेत्राच्या हाकेच्या अंतरावर असलेला टावरीपाडा केडीएमसी वॉटर फिल्टर रोड वर कायम कचऱ्याचे ढिग जमलेले असतात. टावरीपाडा गावाकडे जाणारा व तिथून गौरीपाडा तलावा कडे जाणारा हा मुख्य रस्ता असून सदैव कचऱ्याचे ढिग व त्यामुळे भटके कुत्रे, जनावरांचा वावर असतो. त्यामुळे रस्त्यावरून जाताना नागरिकांना तोंडाला रुमाल व नाक बंद करून जावे लागते.

नागरिकांनी दिलेल्या तक्रारीनुसार स्फूर्ती फाउंडेशन माध्यमातून ब प्रभाग क्षेत्र सहाय्यक आयुक्तांना निवेदन देण्यात आले. यावर कायमस्वरूपी तोडगा निघावा व रस्त्यालगत सुशोभीकरण, वृक्ष कुंड्या ठेऊन कचरा फेकण्यास हा परिसर निषिद्ध करावा अशा उपाययोजना कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. यावर प्रभाग क्षेत्रांच्या अधिकाऱ्यांकडून काय उपयोजना होते याची वाट पाहू, अन्यथा नागरिकांच्या आरोग्याच्या हितार्थ, परिसर स्वच्छ रहावा यासाठी आंदोलन करावे लागेल. हा कचरा ब प्रभाग कार्यालयात आणून टाकू असा इशारा स्फूर्ती फाउंडेशन अध्यक्ष बजरंग तांगडकर व महिला प्रमुख शिल्पा तांगडकर यांनी दिली.



## भिवंडी पालिकेच्यावतीने
# प.रा.विद्यालयात विद्यार्थ्यांचे वृक्षारोपण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी राज्य शासन आदेशानुसार वृक्षारोपण करण्याचे उपक्रम भिवंडी महापालिकेच्या वतीने विविध ठिकाणी राबविण्यात येत आहे.त्यानुसार भिवंडी शहरातील ब्राह्मण आळी येथील प. रा. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात एक पेड माँ के नाम " अभियान अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम महापालिकेच्या माध्यमातून करण्यात आला. यावेळी भिवंडी महापालिका क्रीडा विभाग प्रमुख मिलिंद पळसुले ,महापालिका क्रीडा अधिकारी शरद कलावंत, शालेय समिती अध्यक्ष प्रदिप राका,शाम सिंगासणे,शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.कोंगे यांच्या उपस्थितीत पार पडले.यावेळी शाळेचे उपमुख्याध्यापक श्री.जोशी, पर्यवेक्षिका वानखेडे,शशांक भोईर,सौ.कोठे,एनसीसी प्रमुख नरवडे तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या हस्ते सुध्दा वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वत्र वृक्षारोपणाचे कार्यक्रम होणे आवश्यक आहे नागरिकांनी हा उपक्रम राबवून पर्यावरण अनुकूल ठेवण्यास सहकार्य करावे असे आवाहन मिलिंद पळसुले यांनी यावेळी केले.

# शेवाळयुक्त जागेवर ब्लिचिंग पावडरची फवारणी



## सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाचा समाजहितासाठी अनोखा उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण मधील वालधुनी मध्ये सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाने एक आगळावेगळा उपक्रम राबविला आहे. छ. शिवाजी महाराज नगर येथील विभागात ठिकठिकाणी पावसाच्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात शेवाळ जमा झाले होते. ज्यामुळे स्थानिक नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. चाकरमानी, वृद्ध तसेच विद्यार्थी वर्गाला पाय घसरून पडण्याची भीती निर्माण होत होती. अशा परिस्थितीत सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाकडून विभागातील ज्या ठिकाणी शेवाळ आहेत त्या ठिकाणी ब्लिचिंग पावडर फवारणी करून नागरिकांना एक दिलासा देण्याचं चांगलं शिवकार्य करण्यात आलं.

वालधुनी परिसरातील समाधान अपार्टमेंट, किसन शेट्टी चाळ, तांबे चाळ, सुंदराबाई चाळ, राणे निवास, अनुराग अपार्टमेंट, सनराईज अपार्टमेंट, दत्त मंदिर परिसर, कमानी निवास, मुकुटराव चाळ, संते निवास, लक्ष्मी अपार्टमेंट, गांगुर्डे निवास, घोलप चाळ, मातोश्री चाळ, जाधव चाळ, एखंडे बिल्डींग, निकम निवास, शकुंतला निवास, लक्ष्मण पावशे चाळ, झिपाबाई चाळ, लाकडे निवास, आशा पलेस, सिताराम पावशे चाळ, स्मिता निवास, कमळू पावशे चाळ, काठोळे चाळ, पडवळ चाळ, राधाकृष्ण बिल्डींग, सातारकर चाळ, जेपी तिवारी चाळ, यादव चाळ आदी ठिकाणी ब्लिचिंग पावडर फवारणी करण्यात आली आहे. मंडळाच्या या उपक्रमाबद्दल विभागातील सर्व नागरिकांकडून शिवभक्तांवर कौतुकाची थाप पडत आहे.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# प्रधानमंत्री मातृवंदना योजनेची राज्यात यशस्वी वाटचाल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गर्भवती महिला व स्तनदा मातेचे पोषण आणि आरोग्य जपल्यास पुढील पिढी सुदृढ होईल. तसेच मुलींच्या जन्माबाबत सकारात्मकता वाढावी या उद्देशाने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येते. एकात्मिक बाल विकास प्रकल्पामार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेच्या यशस्वी वाटचालीतून मातांचे आरोग्य, कुटुंबाचा आनंद आणि समाजाचा विकास साधत राज्याचा विकास साधता येणार आहे.


प्रधानमंत्री मातृवंदना योजनेअंतर्गत ३६ जिल्ह्यांचे जिल्हा नोडल अधिकारी आणि बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच क्षेत्रीय स्तरावरच्या मुख्य सेविकांचे मॅपिंग १०० टक्के पूर्ण झाले आहे. या वर्षासाठी ४० हजार नोंदणी करण्यात आली आहे. उर्वरित उद्दीष्ट लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ वर्षासाठी ५ लाख ७० हजार उद्दिष्ट दिले असून, ते कालमर्यादेत नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात येत आहे. यासाठी योजनेअंतर्गत असेलल्या नियमांची पूर्तता आणि प्रलंबित महिला लाभार्थ्यांना त्यांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच २०१७ पासून ज्या महिला योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे आल्या नाहीत, अशा महिलांपर्यंत अंगणवाडी महिला अथवा आशा वर्कर यांच्या सहायाने लाभ पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाकडून राज्यात ही योजना राबविण्यात येत होती. त्यांनतर २०१७ पासून ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविली जात होती. २०१७ पासून आजतागायत ४६ लाख २९ हजार ११९ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला.

जिल्ह्यांच्या नोडल अधिकाऱ्यांमार्फत ३६ जिल्ह्यात, ५५३ प्रकल्पाचे बाल विकास प्रकल्प अधिकारी, ३,८९९ बीट लेवलच्या मुख्य सेविकांचे प्रशिक्षण घेण्यात आले. मॅपिंगचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. लवकरच अंगणवाडी स्तरावरील मॅपिंग पूर्ण करण्यात येणार आहे.गर्भवती व स्तनदा मातांना सकस आहार देणे, गरोदरपणात काम थांबल्यामुळे आर्थिक नुकसानीसाठी मजुरी भरपाई देणे, दुसरे मूल हे मुलगी जन्मास आले असेल तर अतिरिक्त आर्थिक प्रोत्साहन देऊन मुलीबद्दल सकारात्मक दृष्टीकोनास प्रोत्साहन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. मुलीच्या जन्माबद्दल सकारात्मक दृष्टीकोन वाढावा यासाठी गर्भधारणेच्या नोंदणीपासून सहा महिन्याच्या आत प्रसूतीपूर्व तपासणीसाठी महिलेला ३ हजार रूपये देण्यात येतात. तर बाळाच्या जन्मानोंदणी नंतर दोन हजार रूपये देण्यात येतात. म्हणजेच पहिल्या अपत्यासाठी पाच हजार रूपये देण्यात येतात. दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर सहा हजार रूपये देण्यात येतात.

ज्या कुटुबाचे उत्पन्न प्रतिवर्ष आठ लाख पेक्षा कमी असेल, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, अंशत: ४० टक्के किंवा पूर्ण अपंग, बीपीएल शिधापत्रिकाधारक, आयुष्यमान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत लाभार्थी , ई-श्रम कार्ड धारक, किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी शेतकरी, मनरेगा जॉब कार्डधारक, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा कार्यकर्ती, अन्नसुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत रेशनींग कार्डधारक यापैकी किमान एक दस्ताऐवज असल्यास या योजनेचा लाभ घेता येतो. महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी जवळच्या अंगणवाडी केंद्रात संपर्क साधायचा आहे किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र, किंवा उपजिल्हा किंवा जिल्हा रूग्णालयात अर्ज करू शकतात.

# चैतन्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा इको फ्रेंडली बाप्पा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर मध्ये स्किल स्कूल या उपक्रमांतर्गत पर्यावरणपूरक गणपती बनविणे ची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत २९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणपती तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रसिद्ध मूर्तिकार यतीन शेटे यांनी करून दाखविलेअशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

प्रसिद्ध मूर्तिकार यतीन शेटे हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की,विद्यालयाने अतिशय सुंदर उपक्रमाचे आयोजन केले आहे. गणेशोत्सव हा आपला धार्मिक सण व आनंदोत्सव आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणबद्दल प्रेम व जागृती निर्माण होईल. रासायनिक पदार्थांमुळे निसर्गाची होत चाललेली हानी पहाता पर्यावरण पूरक शाडू मातीपासून तयार केलेल्या गणपतीमुळे नक्कीच पर्यावरण राखण्यास मदत होईल.एवढ्या लहान वयात विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने आणि कलाकुसरीने बनविलेल्या या आकर्षक मूर्ती व त्यांना केलेले रंगकाम लक्ष वेधून घेतात.सर्व विद्यार्थ्यांनी शाडू माती पासून तयार केलेले पर्यावरणपूरक गणपती आपल्या घरी बसवावेत व इतरांना ही ते बसविण्यास प्रेरित करावे असे त्यांनी सांगितले.यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याची शपथ घेतली. या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे कलाशिक्षक संतोष सोनवणे व बाळासाहेब साबळे यांनी प्रोत्साहित व मार्गदर्शन केले. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी संतोष कांबळे,राजाराम शिंदे,विशाल चौधरी,मिलिंद खेत्री,लक्ष्मण दुडे,सोनाली माळवे,योगेश फापाळे,शशिकांत सोमवंशी यांनी सहकार्य केले.

सर्व उपक्रमातील सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे ग्रामविकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे,प्रभाकर तांबे,राजेंद्र डुंबरे,रघुनाथ तांबे, प्रदीप गाढवे,पंकज घोलप, संजय हिरे,अनिल उकिरडे, अजित डांगे व पालकांनी अभिनंदन केले.

# रायगड जिल्ह्यात गणेश विसर्जन मिरवणुकीत लेझर लाईट वापरास बंदी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान लेझर लाईटमुळे नागरिक तसेच बंदोबस्तासाठी नियुक्त अधिकारी-कर्मचारी यांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा विचार करता, जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे.

दि. ०२ सप्टेंबर २०२५ (५ दिवसांचे विसर्जन) आणि दि. ०६ सप्टेंबर २०२५ (११ दिवस-अनंत चतुर्दशी) रोजी होणाऱ्या श्री गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान लेझर लाईटचा वापर करण्यास कडक बंदी घालण्यात आली आहे. अनेकदा मिरवणुकीतील ध्वनीक्षेपकांचा दणदणाट, डॉल्बी साऊंड सिस्टम, स्नो स्प्रे, हिट स्प्रे आणि लेझर बीम लाईट्समुळे नागरिकांना बहिरेपणा, हृदयविकाराचे झटके तसेच डोळ्यांचे आजार उद्भवले असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून ही कारवाई करण्यात आली आहे. सदर आदेशाचा भंग करून विसर्जन मिरवणुकीत लेझर लाईट वापर करणाऱ्या व्यक्ती/संस्था/मंडळ/संचालक यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये दंडनीय कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिला आहे.




# गणेशोत्सवात निसर्गासाठी 'संकल्प भेट'
## उपक्रमातून पक्षी व पर्यावरण संवर्धनाचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भक्ती, आनंद आणि सेवाभावाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवात या वर्षी एक वेगळा संदेश दिला जात आहे. बाप्पाच्या पूजेसोबतच निसर्गाच्या रक्षणाचा संकल्प! योगदान फाउंडेशन ट्रस्टने या पार्श्वभूमीवर 'संकल्प भेट' हा विशेष उपक्रम सुरू केला असून नागरिकांनी पर्यावरण संवर्धनासाठी हातभार लावावा, असे आवाहन संस्थेने केले आहे. या उपक्रमाचा उद्देश फक्त देवाप्रती श्रद्धा व्यक्त करण्यापुरता न राहता, निसर्गासाठी ठोस योगदान देण्यावर आहे. कारण, सध्या नद्या आटत आहेत, जंगलांचे प्रमाण झपाट्याने कमी होत आहे आणि पक्ष्यांची संख्या चिंताजनकरीत्या घटत आहे. ही धोक्याची घंटा आहे आणि प्रत्येकाने यात आपली जबाबदारी ओळखण्याची वेळ आली आहे. योगदान फाउंडेशनने आजवर पर्यावरण संवर्धनासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. पक्ष्यांसाठी घरटी तयार करणे, उन्हाळ्यात पाणवठे उपलब्ध करून देणे, वृक्षारोपण व त्यांचे संगोपन, तसेच जनजागृती मोहिमा राबवणे यांचा समावेश आहे. या कामांना गती देण्यासाठी आणि अधिक लोकांचा सहभाग मिळवण्यासाठी 'संकल्प भेट' हा उपक्रम सुरू केला आहे. "एका छोट्याशा देणगीतून एका पक्ष्याला घर मिळू शकते, त्याच्या उपचारासाठी मदत मिळू शकते, एखाद्या झाडाला पाणी मिळू शकते आणि निसर्गाला नवसंजीवनी मिळू शकते. बाप्पा विघ्नहर्ता आहेत, पण निसर्गातील विघ्न दूर करण्याची जबाबदारी आपली आहे," असे मत योगदान फाउंडेशनचे संस्थापक मदन चव्हाण यांनी व्यक्त केले. गणेशोत्सव हा फक्त धार्मिक उत्सव न राहता सामाजिक जागृतीसाठीही महत्त्वाचा ठरावा, यासाठीच हा उपक्रम राबवला जात आहे. गणेशभक्तांनी 'संकल्प भेट' उपक्रमात सहभागी होऊन निसर्ग आणि पक्षी संवर्धनात हातभार लावावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
### उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१, विस्तार-२३४

### नोटीस

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमूद अर्जदाराने विकास कामात बाधित होणारी झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | झाडे तोडावयाचे ठिकाण | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | मे. सॅब रिअलिटी तर्फे श्री. जोहर हसन झोजवाला | स.नं. ५३/१/१ व ५४ पार्ट, मौजे-कल्याण | ०२ | इमारतीच्या संरक्षक भिंतीच्या बांधकामात बाधित होत असल्याने |
| २ | चंदन छाया को. ऑ. हौ. सो. लि., कु.मु.प.धा. मे. कुलदीपक कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री. राकेश मुथा व श्री. कमलेश बापू जाधव | सि.स.नं. ३०५३ ,३०६३ अ व ३०६६, मौजे-कल्याण | ०३ | नविन इमारतीच्या बांधकामात बाधित होत असल्याने |
| ३ | थारवानी मोहन, श्री. जितेंद्र एल. छेडा भागीदार मे. धनलक्ष्मी एन्टरप्रायझेस इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे श्री. मोहन एच थारवानी | स.नं. ३४/अ/१ब, स.नं. ३५/१/१ ब, व स.नं. ३६/५/ब, मौजे-चिकणघर | ०१ | इमारतीच्या प्रवेश द्वारामध्ये व अग्निशमन वाहनाच्या हालचालीमध्ये बाधित होत असल्याने |
| ४ | श्री. जोहर हसन झोजवाला | स.नं. २०/२ ई/४ ब/२/१, मौजे-चिकणघर | ०३ | गटार बांधणेच्या कामात बाधित होत असल्याने |

सदरची झाडे तोडण्यास/पुनर्रोपणास परवानगी देणे अगोदर कोणाच्या काही हरकती असल्यास त्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या हरकती असल्यास ७ दिवसाच्या आत उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह देण्यात याव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणे/पुनर्रोपण करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही /-
(संजय जाधव)
वृक्ष अधिकारी
वृक्ष प्राधिकरण विभाग,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण.

जा. क्र. कडोंमपा/जसंवि/मुका/४३७
दिनांक : २६/०८/२०२५

## कल्याणमध्ये
# मोदक स्पर्धा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सुभेदारवाडा कट्टा, कल्याण विकास फाउंडेशन आणि दी महिला सहकारी उद्योग मंदिर मर्यादित यांच्या संयुक्त विद्यमाने मोदकोत्सव २०२५ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम शनिवार, ३० ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता अभिनव विद्यामंदिर, पारनाका, कल्याण (प.) येथे होणार आहे.

या मोदकोत्सवात दोन विभागांत स्पर्धा होणार आहेत. गट १ : उकडीचे मोदक (गुळ-खोबऱ्याच्या सारणाव्यतिरिक्त इतर सारणास). गट २ इतर प्रकारचे मोदक (पनीर, रवा, पुरण, चॉकलेट, काजू आदी). उकडीचे मोदक हाताने बनविलेले असणे बंधनकारक असून, साच्याचे मोदक ग्राह्य धरले जाणार नाहीत. मोदक घरून आणायचे असून सजावट मात्र स्पर्धास्थळीच करावी लागेल.

स्पर्धकांना फक्त एका गटातच सहभागी होता येणार आहे. याशिवाय प्रेक्षकांसाठी उखाणे स्पर्धा हे विशेष आकर्षण ठरणार आहे. स्पर्धकांसाठी नावनोंदणीची अंतिम तारीख गुरुवार, २८ ऑगस्ट २०२५ अशी निश्चित करण्यात आली आहे. सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जाणार असून विजेत्यांना प्रमाणपत्रासह ट्रॉफी प्रदान करण्यात येईल.

संपर्क : ९०८२४४९८४३, ९८१९२८८६८०, ९८२०८९३०४९, ९१६७६१०७७६, ८८७९८८५७३९, ९९८७४२९०२४

# जिल्हाधिकारी कार्यालयात सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत कामकाज पूर्ण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवर एकूण १ हजार ३९० अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून, सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत आस्थापना विषयक विविध उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांची बिंदुनामावली तयार करून कोकणभवन येथून तपासून घेण्यात आली असून आवश्यक दुरुस्त्या करून ती प्रमाणित करण्यात आली आहे. तसेच दोन्ही संवर्गातील अंतिम जेष्ठता यादी देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे.

१ हजार ३७१ अधिकारी-कर्मचाऱ्यांपैकी iGot पोर्टलवर १ हजार ३१९ जणांचे रजिस्ट्रेशन पूर्ण झाले असून त्यापैकी ४८४ कर्मचाऱ्यांनी ५ कोर्सेस पूर्ण केले आहेत. १ ऑगस्ट २०२४ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत १७८ अधिकारी-कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला असून ६१ जणांना स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्याच कालावधीत ११ कर्मचाऱ्यांना शिपाई संवर्गातून महसूल सहायक संवर्गात तर आणखी ११ कर्मचाऱ्यांना ग्राम महसूल अधिकारी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.मागील वर्षी राज्य शासनाच्या नियुक्त्यांतर्गत जिल्ह्यात २१६ उमेदवारांना ग्राम महसूल अधिकारी, १८ उमेदवारांना महसूल सहायक तसेच पुरवठा विभागात ४१ उमेदवारांना महसूल सहायक म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. गट क व ड संवर्गातील २५ मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा नियुक्ती देण्यात आली असून प्रतिक्षा यादीतील बहुतांश उमेदवारांना संधी देण्यात आली आहे.याशिवाय जिल्ह्यातील कोतवाल व पोलीस पाटील संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरू असून, जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुतांश कर्मचाऱ्यांचे सेवा अभिलेख डिजिटल करण्यात आले आहेत.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १५० दिवसांच्या कार्यक्रमात अंतर्भूत असलेल्या आस्थापना विषयक सर्व बाबींचे १०० टक्के कामकाज रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाने पूर्ण केल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024


माजी आमदार
मा. श्री. नरेंद्र पवार यांना
वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा !
शुभेच्छूक
मा. श्री. आमदार किसन कथोरे
मुरबाड विधानसभा मतदार संघ
मा. श्री. रवींद्र घोडविंदे
संपादक दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता